# मेट्रो ३ च्या भुयारीकरणाचा २८ वा टप्पा पूर्ण

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** चार किलोमीटरचे भुयारीकरण २६ महिन्यांत पूर्ण करत मेट्रो ३ ने गुरुवारी भुयारीकरणाचा २८वा टप्पा गाठला. एकाच वेळी इतक्या लांबीचे भुयारीकरण सलगपणे पूर्ण होण्याची या प्रकल्पातील ही पहिलीच वेळ आहे. या भुयारीकरणानंतर कुलाबा ते सीप्झ या मेट्रो ३च्या एकूण मार्गिकेचे ८२ टक्के (४५ किमी) भुयारीकरण पूर्ण झाले.

वैतरणा २ या टनेल बोअरिंग मशिनने (टीबीएम) २ फेब्रुवारी २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो स्थानकापासून भुयारीकरणास सुरुवात केली होती. एकूण दोन हजार ७३० सेगमेन्ट रिंग्जचा वापर करून २६ महिन्यांत चार किमी भुयारीकरण पूर्ण करत हे टीबीएम गुरुवारी मुंबई सेंट्रल स्थानकात बाहेर आले. या भुयारीकरणामुळे मेट्रो ३ च्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानक ते ग्रँट रोड या पॅकेज दोनमधील १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले. विशेष म्हणजे टाळेबंदीच्या काळात सर्व नियमांचे पालन करत हे काम मेट्रो ३ने पूर्ण केले आहे.



> या भागात जमिनीखाली केवळ एक ते चार मीटरवर असलेली भूजल पातळी, त्याचबरोबर जुन्या आणि धोकादायक इमारती अशा आव्हानांना तोंड देत भुयारीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले.
>
> **रणजीत सिंह देओल,** व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन

'या टप्प्यात जुन्या आणि धोकादायक स्थितीतील इमारतींना सांभाळून भुयारीकरणाचे काम पूर्ण करणे आव्हानात्मक होते. हा टप्पा समुद्राला समांतर असणे तसेच या भागात जमीनीखाली केवळ एक ते चार मीटरवर असलेली भूजल पातळी ही आव्हाने पेलत भुयारीकरण पूर्ण केल्याचे, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशने व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी सांगितले. तसेच या काळात करोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी शासनाच्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. भुयारीकरण पूर्ण झालेल्या टप्प्यात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, काळबादेवी, गिरगाव आणि ग्रँट रोड आणि मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.

टाळेबंदीच्या काळात राज्य शासनाच्या सूचना आणि मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करत काही अत्यावश्यक व अनिवार्य कामेच केली जात होती. टनेल बोअरिंग मशिनचे कार्यान्वयन संथ गतीने करण्याचा यामध्ये समावेश आहे.